# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

राष्ट्रसंत आचारी श्री पद्मसागर सुरश्वरजी भवन, सेक्टर ७, रामनगर,
शांती गार्डन, मिरा रोड पुर्व, ठाणे ४०११०७
फोन नंबर ०२२-२९४५१००१
**Email ID :- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


---

प्रेस नोट क्रमांक ६०

दिनांक : १५/०३/२०२१

*प्रेस नोट*

**चोरलेल्या मोटार सायकलची बनावट कागदपत्रे बनवून, त्यांची ओ.एल.क्स व्दारे विक्री करणाऱ्या दोन आरोपीतांना गुन्हे शाखा -२ वसई युनिट यांनी अटक करुन १२ दुचाकी हस्तगत**

दिनांक २०/१०/२०२० रोजी १८.३० वाजता ते दिनांक २१/१०/२०२० रोजी ०८.३० वाजताचे दरम्यान फिर्यादी एल्वीरीसय जॉन घोन्सालवीस वय २८ वर्षे,रा.धंदा नोकरी रा. घर नं.७९८, उमरळे, वैदयदौडी नालासोपारा प.ता.वसई जि.पालघर यांनी त्यांची ॲक्टीव्हा स्कुटी मो.सायकल क्रं एम.एच.४८ ए.एडी.७८६८ ही बसडेपोच्या बाजुला मोकळया जागेतुन नालासोपारा प. मोकळया जागेत पार्क करुन ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन नालासोपारा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३४१/२०२० भादविसं कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील आरोपीत यांचा तांत्रीक बाबी व गुप्त बातमीदाराच्या मदतीने माहीती प्राप्त करुन आरोपीत नामे- १) शुभमकुमार वृध्दिचंद्र शर्मा वय २२ वर्षे, रा.जिवदानी कॉम्लेक्स, बी/४०१, चौथा माळा, संतोषी माता मंदीर जवळ, आचोळागांव, नालासोपारा पुर्व, २) रोहन सुनिल सिंग वय १९ वर्षे रा. बि/१०३, गुलमोहर अपा. वाघेश्वरी हिल्स, मॅकडॉनल्ड जवळ नालासोपारा पश्चिम. ता. वसई, जि. पालघर यांना अटक करुन त्यांचेकडे नमुद गुन्ह्याच्या अनुशंगाने विचारपुस केली असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याचे कबुली दिली असुन नमुद गुन्हयातील चोरी केलेली, इतर चोरी केलेल्या मो. सायकल व गुन्हे करण्यासाठी वापरलेली एक मोटर सायकल अशा एकुण १३ मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. आरोपीत शुभमकुमार वृध्दिचंद्र शर्मा हा चोरी केलेल्या मोटार सायकलचे घरातील लॅपटॉप वर बनावट कागदपत्रे बनवुन त्यांना ओ.एल.एक्स वर लोकांना विक्री केल्याने सदर लॅपटॉप हस्तगत करण्यात आला आहे. वरील अटक आरोपीतांकडून मोटार सायकल चोरीचे नालासोपारा पो.स्टे.- १, कापुर बावडी पो.स्टे.-१ कासार वडवली – १, नारपोली पो.स्टे.- १, कुंभारवाडा पो.स्टे.-१, एम.एच.बी. कॉलनी पो.स्टे. – १, कस्तुरबा मार्ग पो.स्टे.- १ असे एकुण ७ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच सदर गुन्हे करण्यासाठी वापरलेली आरोपीत शुभमकुमार वृध्दिचंद्र शर्मा याची एक मोटर सायकल हस्तगत करण्यात आली आहे. उर्वरीत मोटर सायकलचा तपास सुरु असुन, त्यांची दि. १७/०३/२०२१ पर्यंत मा. न्यायालयाने पोलीस कस्टडी मंजुर केली आहे.

तसेच  तुळींज पो.ठाणे गु.र.नं. १०७४/२०२० भादंविसं. कलम ३७९ या गुन्हयात विधी संघर्षीत बालक वय १५ वर्षे रा. धानीव बाग, नालासोपारा पुर्व यांस ताब्यात घेवून त्याचेकडून सदर गुन्हयातील चोरीस गेलेली ज्युपीटर स्कुटर व माणिकपुर पो.ठाणे गु.र.नं. २०३/२०२० भादंविसं. कलम ३७९ या गुन्हयातील चोरीस गेलेली ज्युपीटर स्कुटर असे एकुण ५०,०००/- रु. किंमतीच्या स्कुटर हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.

अर्नाळा पा.ठाणे गु.र.नं. ०३/२०२१ भादंविसं.कलम ४२०, ३४ या गुन्हयातील आरोपीत नामे चंदन उदयराज सिंह उर्फ ठाकुर रा. जि.प्रतापगड, उत्तर प्रदेश यांस प्रतापगड येथन अटक करुन त्याचेकडून फसवणुक केलेल्या १५,००,०००/- रु. पैकी ८,००,०००/- रु. हस्तगत करुन त्यास पुढील तपासकामी अर्नाळा पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) डॉ. श्री. महेश पाटील व सहा पो.आयुक्त, (गुन्हे) श्री. राजेंद्र देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा -२, चे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे, सपोनि/श्री. संतोष गुर्जर, सपोनि/सुहास कांबळे, सफौ./वेदपाठक, पो.हवा./मंगेश चव्हाण, पो.हवा/संजय नवले, पो.हवा./रमेश भोसले, पो.हवा./ विकास यादव, पो.ना./रमेश अलदर, पो.ना./प्रशांत पाटील, पो.ना./१७७१ अमोल तटकरे, पो.ना./प्रशांत ठाकुर, पो.कॉ./११८७ शरद पाटील व पो.कॉ./१७९६ अमोल कोरे यांनी केली आहे.